**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रं. ०३ चा पुढील सरतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री आर.बी. कुळकणी यांचे मार्फत सुरू</u> :—**

०३. मी या प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

सरतपास संपला.

**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री एस.एन. ठोकळ यांचे तर्फे सुरू</u> :—**

**०४.** वादी देवानंद हा माझा भाउबंद आहे. वादीने सन २०१८ साली जो रिपोर्ट दिल्याचे मी सांगत आहे तो रिपोर्ट निश्चीत कोणत्या तारखेला दिला आहे हे मला सांगता येणार नाही. त्या रिपोर्ट अन्वये वादी देवानंद विरूध्द कोणकोणत्या कलमा अतंर्गत शिक्षापात्र गुन्हे दाखल झाले होते याबाबत मला माहीती नाही. लोकमत या वृत्तपत्रात सदर प्रकरणाबाबत जी बातमी प्रसिध्द झाल्याचे मी कथन करतो ती बातमी कुणी दिली होती याबाबत मला काहीही माहीती नाही. आमच्या गावात ज्या ज्या लोकांकडे लोकमत हे वृत्तपत्र येते त्यांची नावे मला माहीत आहे परंतु मला वादीचे वकीलांनी ती नावे विचारली नाही म्हणुन मी ती सांगितली नाही व म्हणुन ती माझे पुराव्याचे शपथपत्रात नमुद नाही. गावात झालेल्या चर्चेमुळे व वर्तमानपत्रात आलेल्या बातमीमुळे वादीची बदनामी झाल्याचे मला कळाले. हे म्हणणे खरे नाही की, वादीची समाजात बदनामी झाली, ही माझी ऐकीव माहीती आहे. वादीची बदनामी झाली, असे माझे मत आहे.

०५. माझे शिक्षण वाणिज्य शाखेतील पदवीपर्यंत झाले आहे. मी या प्रकरणात पुरावा देण्याअगोदर वादीची फौजदारी खटल्यातुन ज्या न्यायनिर्णयान्वये निर्दोषमुक्तता झाली तो न्यायनिर्णय वाचलेला नाही. मी जे गावात विविध कार्यक्रम झाल्याचे माझे पुराव्याचे शपथपत्रात नमुद केले आहे त्या विविध कार्यक्रमाचे सविस्तर वर्णन मी माझे पुराव्याचे शपथपत्र तयार करतेवेळी वादीचे वकीलांना सांगितलेले नाही. सन २०१८ पुर्वी वादी हे भारतीय जनता पक्षाचे बुथ प्रमुख होते, हे दर्शविणारे कागदपत्र मी स्वत: वादीचे वकीलांना दिलेले नाही. तसेच सदरहु

गुन्हयामुळे भारतीय जनता पक्षाने वादीला दायीत्वातुन मुक्त केले हे दर्शविणारे पत्र सुध्दा मी वादीचे वकीलांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीला प्रतिवादीने चुकीच्या गुन्हयामध्ये अडकविले, असे माझे मत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरून मी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल करून आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

सा.वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष/ श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/—
( एम.एस. काळे )
दिनांक ०६.०३.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अकोला.

<u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this P. D. F. file Order are same word for word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Shri. M.S. Kale,<br>Jt. Civil Judge, Sr. Dn.<br>& Addl. C.J.M.,Akot. |
| Name of the Steno | :- | S. G. Jaiswal |
| Date of Order | :- | 6-03-2026 |
| Order Signed by P.O. on | :- | 6-03-2026 |
| Order uploaded on | :- | 6-03-2026 |